# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/E94466 दिनांकः 29/12/2021

**विषयः कोरोना विषाणूंचा (Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता उद्योजकांना विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणेबाबत.**

**संदर्भः** १) परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/बी-५०८४९ दिनांक ०१.०७.२०२०
२) परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/सी-६९५९३ दिनांक २२.१०.२०२०
३) परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/सी-९६१८० दिनांक ११.११.२०२०
४) परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/सी-३९४९४ दिनांक २४.०५.२०२१

महामंडळाने कोरोना विषाणूचा (Covid-१९) च्या पार्श्वभूमीवर भूखंडधारकांना सन-२०२०-२०२१ मध्ये विविध सवलती दिल्या होत्या त्यामध्ये त्यामध्ये ज्या भूखंडधारकांनी भूखंडावरील इमारतीचे नकाशे मंजूर करुन घेऊन इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे व ज्या भूखंडधारकांचा विकास कालावधी/ वाढीव विकास कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये संपलेला आहे/संपणार आहे अशा उद्योजकांना १६ महिन्याचा कालावधीकरीता विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे.

परंतु ज्या भूखंडधारकाचा विकास कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ नंतर संपलेला आहे. कोरोना विषाणूंच्या(Covid) महामारीच्या कालावधीमध्ये ते भूखंडावर कोणताही विकास करु शकलेले नाहीत. तथापि इतर भूखंडधारकांप्रमाणे कोरोना विषाणूच्या(Covid) कालावधीत विनाशुल्क मुदतवाढीचा त्यांना कोणताही लाभ देण्यात आलेला नाही. अशा भूखंडांकडून कोरोना कालावधीमध्ये त्यांचा वाया गेलेला कालावधी तसेच महामंडळाने इतर भूखंडांना लागू केलेला विनाशुल्क विकास कालावधी त्यांनाही लागू करणेबाबत उद्योजकांकडून विनंती प्राप्त होत असल्याने ज्या भूखंडाचा कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ नंतर संपलेला आहे व त्यांना कोरोना विषाणूच्या(Covid) चा विनाशुल्क कालावधी लागू करण्यात आलेला नाही अशा भूखंडांना सुध्दा विनाशुल्क विकास कालावधी लागू करणेबाबत विषय सदस्य

मंडळाच्या दिनांक ३०.११.२०२१ रोजी झालेल्या झालेल्या ३९१ व्या बैठकीत चर्चेस्तव सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर सदस्य मंडळामध्ये सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ६३४३ पारीत करण्यात आला.

सदरहू पारीत ठरावानुसार ज्या भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ नंतर संपलेला आहे अशा भूखंडधारकांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी विनाशुल्क खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

१. ज्या भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ नंतर संपलेला आहे व ज्या भूखंडधारकांनी भूखंडावरील इमारतीचे बांधकाम नकाशे मंजूर करुन घेवून इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे अशा भूखंडांचा कोव्हिड विनाशुल्क कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ मधील जेवढा विकास कालावधी/ वाढीव विकास कालावधी वाया गेला आहे. तेवढा कालावधी त्यांच्या भूखंडाच्या विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपल्याच्या दिनांकापासून विनाशुल्क वाढवून देण्यात यावा.

   (उदा. एखादा भूखंडधारकाचा दिनांक ३०.०८.२०२१ रोजी विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपला असेल व त्याला दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कोव्हिड विनाशुल्क कालावधीचा लाभ मिळाला नसल्याने सदरहू भूखंडधारकास दिनांक ०१.०९.२०२१ ते ३१.१२.२०२२ पर्यन्तचा कालावधी विनाशुल्क वाढवून देण्यात यावा.

२. जर भूखंडधारकाने त्याचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपल्यानंतर सशुल्क मुदतवाढ घेतली असल्यास सदरहू सशुल्क मुदतवाढीचा कालावधी संपल्याच्या तारखेपासून त्याचा कोव्हिडच्या कालावधीमधील जेवढा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी वाया गेला आहे तेवढा विकास कालावधी / वाढीव विकास कालावधी विनाशुल्क वाढविण्यात यावा.

३. जर भूखंडधारकाने दिनांक ३०.०६.२०२१ नंतर सशुल्क मुदतवाढ घेतली असेल व विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपल्याच्या दिनांकापासून विनाशुल्क मुदतवाढ देण्याची तसेच मुदतवाढीसाठी भरलेली रक्कम परत करण्याकरीता विनंती केल्यास अशा प्रकरणी भूखंडाचा विकास कालावधी/ वाढीव विकास कालावधी संपल्याच्या दिनांकापासून कोव्हिड विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करण्यात यावी. तसेच त्यांनी भरलेली मुदतवाढ शुल्क परत न करता समायोजित करण्यात यावी.

४. सदरहू विकास कालावधी वाढविण्याचे अधिकार महामंडळाच्या दिनांक २६.०९.२०१६ च्या परिपत्रकानुसार औद्योगिक, व्यापारी, निवासी, प्राधान्य सदराखालील भूखंड वाटपाच्या /हस्तांतरणाच्या अधिकारानुसार संबंधित प्रादेशिक अधिकारी / उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

**(अजित पाटील)**
**सह.मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई